| सी.एन.आर. क्र.– एम.एच.एन.एस.–२०००–०९५८–२०१७ | दाखल तारीख | – | ०८/०६/२०१७ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | – | ०८/०६/२०१७ |
| | निकाल तारीख | – | १२/०५/२०२६ |
| | कालावधी | – | ०८वर्ष ११महिने ०४दिवस |

## सिन्नर येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, यांचे न्यायालयात
## ता. सिन्नर, जि. नाशिक
## ( पिठासीन अधिकारी लक्ष्मीकांत चं. वाडीकर )

**नियमित फौजदारी खटला क्र.११५/२०१७** **निशाणी क्र. ५२**

........................................................................................

प्रथम खबरी अहवालाचा तपशील –
गुन्हा रजि. क्र. – १७१/२०१६, दिनांक ०२/०९/२०१६.
पोलीस ठाणे – सिन्नर पोलिस ठाणे.

........................................................................................

महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस अधिकारी,
पोलीस ठाणे **सिन्नर,**
ता. सिन्नर, जि. नाशिक **.... अभियोग पक्ष**

**–//विरुध्द //–**

१. **दत्तु गोपाळा सदगिर,**
वय ४० वर्ष, व्यवसाय – शेती,

२. **नाथा उर्फ एकनाथ गोपाळा सदगिर,**
वय ३७ वर्ष, व्यवसाय – शेती,

३. **कुसुमबाई दत्तु सदगिर,**

वय ३७ वर्ष, व्यवसाय – शेती,

४. **कमळाबाई गोपाळा सदगिर,**
वय ६७ वर्ष, व्यवसाय – शेती,
सर्व रा. शरदवाडी रोड सरस्वती नगर,
ता. सिन्नर, जि. नाशिक. **.... आरोपी**

**आरोप – भारतीय दंड विधान कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये**

..........................................................................................

सरकारी वकील श्री. जे. एस. पाटील ..... अभियोग पक्षातर्फे
वकील श्री. एस. डी. चांदोरे ..... आरोपींतर्फे

..........................................................................................

**भाग 'ब'**

**फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परिच्छेद ४४ (ii)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०१/०९/२०१६ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | ०२/०९/२०१६ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०८/०६/२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २९/१२/२०२२ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | २०/०४/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयास ठेवल्याची तारीख | १२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | १२/०५/२०२६ |
| प्रकरणात काही शिक्षा झाल्याची तारीख | – |

## आरोपीचा तपशिल

| अनु क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | दोषी ठरविले की, निर्दोष मुक्त केले | शिक्षा झाली असल्यास, तपशिल | संपरिक्षे दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दत्तु गोपाळा सदगिर | ०७/०९/२०१६ | ०७/०९/२०१६ | भारतीय दंड विधान कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| २. | नाथा उर्फ एकनाथ गोपाळा सदगिर | ०७/०९/२०१६ | ०७/०९/२०१६ | | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ३. | कुसुमबाई दत्तु सदगिर | ०७/०९/२०१६ | ०७/०९/२०१६ | | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ४. | कमळाबाई गोपाळा सदगिर | ०७/०९/२०१६ | ०७/०९/२०१६ | | निर्दोष मुक्त केले | – | – |

## परिशिष्ट I

## भाग 'क'

## फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परिच्छेद ४४ (iii)
## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | दत्तात्रय सावळीराम दातीर– निशाणी क्र. ३७ | फिर्यादी |
| सा.क्र. २ | जनाबाई दत्तात्रय दातीर– निशाणी क्र. ३९ | साक्षीदार |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांकाची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ३८ | फिर्यादि जबाबावरील सही |

## बचाव पक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ३९ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी क्र. ४१ | दत्तात्रय दातीर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ३. | निशाणी क्र. ४२ | जनाबाई दातीर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

## बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांकाची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमालाचे वर्णन | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | एक लांब बाहीचा शर्ट फिकट रंगाचा तपकिरी रेशा असलेला जुना वापरता | घटनास्थळ पंचनामा |
| २. | एक राखाडी रंगाची हॅाफ पॅन्ट नायलान कमर पट्टा असलेला तिस दोन जांभळे पट्टी असलेली, जुनी मळकटलेली, फाटलेली वापरती | |

## न्यायनिर्णय

## (अधिघोषित दिनांक १२/०५/२०२६)

प्रस्तुत आरोपींचे विरूध्द भारतीय दंड विधान, १८६० (संक्षिप्तमध्ये यापुढे 'भादंवि') चे कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणा–या गुन्ह्यासाठी संपरिक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाच्या खटल्याचा थोडक्यात सारांश असा की, मौजे सिन्नर येथील शरदवाडी रोड, सरस्वती नगर येथील फिर्यादीचे घरात, ता. सिन्नर, जि. नाशिक, दि. ०१/०९/२०१६ रोजी २१.०० ते २२.०० वाजणेचे सुमारास गुन्हा घडला होता. आरोपींनी फिर्यादीचे घरासमोर मुद्दाम वाहन लावले म्हणुन फिर्यादीने त्यांना समजवुन सांगण्यासाठी गेले असता की, "येथे वाहने लावु नका, आमचे घराजवळ घान करु नका" या बोलण्याचा ओरापींना राग आल्याने आरोपींनी संगनमत

करुन फिर्यादीचे राहते घरात अनाधिकारे प्रवेश केला व फिर्यादीची गच्ची पकडुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. साक्षीदार समजावुन सांगण्यासाठी गेली असता आरोपींनी त्यांना हाताचे चापटीने मारहाण करुन वाईटसाईट शिवीगाळ केली व "तुमचा दोघांचा बेत पहातो, तुमचा जिवच घेतो" असा दम दिला होता.

३. सदर घटनेबाबत फिर्यादी नामे दत्तात्रय सावळीराम दातीर यांनी सिन्नर पोलिस ठाणे, सिन्नर येथे आरोपींविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादीन्वये सिन्नर पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदणी क्र.१७१/२०१६ दाखल झाला. सहा.पो.उपनिरीक्षक श्री. एम.एस.जाधव, सिन्नर पोलिस ठाणे यांनी गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. संपुर्ण तपास झाल्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोप पत्र क्र. ०३/२०१७ दाखल केले.

४. सर्व आरोपी प्रस्तुत खटल्याचे कामी हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी क्र. १४ अन्वये भादंविचे कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असणा–या गुन्ह्याचा दोषारोप निश्चित केला. दोषारोपातील सर्व मजकूर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. सदर आरोपींनी निशाणी क्र. १५ ते १८ अन्वये सदरचा गुन्हा नाकबूल केला. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

५. अभियोगपक्षातर्फे श्री. जे. एस. पाटील सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे श्री. एस. डी. चांदोरे यांचा युक्तिवाद ऐकला.

६. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वरील बाबींचा विचार करता खालील मुद्दे माझे विचाराधीन आले आहेत. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष मी कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी मौजे सिन्नर येथील शरदवाडी रोड, सरस्वती नगर येथील फिर्यादीचे घरात, ता. सिन्नर, जि. नाशिक, दि. ०१/०९/२०१६ रोजी २१.०० ते २२.०० वाजचे सुमारास फिर्यादीचे परवानगी शिवाय त्याचे राहते घरामध्ये अनाधिकाराने प्रवेश केला म्हणून भा.दं.वि.चे कलम ४५२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | ..... **नाही.** |
| २. | वर नमूद वेळ, दिनांक व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस व त्याचे पत्नीस लाथाबुक्क्यांनी व हाताचे चापटीने मारहाण करुन अपखुशीने दुखापत पोहोचवून भा.दं.वि.चे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | ..... **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमूद वेळ, दिनांक व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस व त्याचे पत्नीस शिवीगाळ करुन त्यांचा अपमान सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा इतर गुन्हा त्याचेकडून व्हावा, या उद्देशाने केला व त्याद्वारे भा.दं.वि.चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | **..... नाही.** |
| ४. | वर नमूद वेळ, दिनांक व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस व त्याचे पत्नीस जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भा.दं.वि.चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | **..... नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **.....आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

# **का र ण मि मां सा**

## **मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ करीता** :-

७. सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने व पुरावा एकत्रित आल्याने त्यांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे. दत्तात्रय सावळीराम दातीर(सा. क्र. १) यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, साक्षीदार आरोपींना ओळखत असुन एकाच गावात शेजारी राहण्यास आहे. घटना दि. ०१/०९/२०१६ रोजी रात्री ०९.०० ते १०.०० वाजता घडली होती. घटनेबाबत त्यांना आठवत नसल्याचे कथन केले. फिर्यादीने

फिर्यादी जबाबावरील स्वाक्षरी नि.क्र. ३८ ओळखली परंतू, त्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले. घटनेच्या दिवशी रात्री ०९.०० वाजता घराजवळ वाहन का लावले व आमचे जागेत धुणे, भांडे धुतात या कारणावरुन आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी कुरापत काढुन त्यांना लाथाबुक्क्यांनी अवघड जागेवर मारहाण केली व गच्ची धरुन खाली पाडले तसेच, त्यांच्या पत्नीचे केस ओढुन चप्पलने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व तिचे कंबरेचे माकड हाड मोडले होते ह्या बाबी स्पष्टपणे नाकारल्या आहेत. आरोपींनी शिवीगाळ केली व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली नसल्याचे कथन केले. फिर्यादी अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले.

८. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांना त्यांच्या फिर्यादी जबाबातील चिन्हांकित भाग अ वरील मजकूर वाचून दाखविण्यात आला असता, तो बरोबर नसल्याचे त्यांनी कथन केले. फिर्यादी जबाब पोलिसांनी तसा का नमुद केला याबाबत ते सांगू शकत नाही असे कथन केले. पुढे त्याने तडजोड झाल्याने त्यांच्यातील वाद मिटले असल्याचे कथन केले आहे. पुढे त्याने तडजोड झाल्याने आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

९. अभियोग पक्षातर्फे (सा. क्र. २) जनाबाई दत्तात्रय दातीर यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, साक्षीदार आरोपींना

ओळखत असुन एकाच गावात शेजारी राहण्यास आहे. दि. ०१/०९/२०१६ रोजी रात्री काय घटना घडली त्यांना आठवत नसल्याचे कथन केले. घटनेच्या दिवशी रात्री ०९.०० वाजता घराजवळ वाहन का लावले व आमचे जागेत धुणे, भांडे धुतात या कारणावरुन आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी कुरापत काढुन त्यांचे पतीस लाथाबुक्क्यांनी अवघड जागेवर मारहाण केली व गच्ची धरुन खाली पाडले तसेच, त्यांचे केस ओढुन चप्पलने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व त्यांचे कंबरेचे माकड हाड मोडले होते ह्या बाबी स्पष्टपणे नाकारल्या आहेत. आरोपींनी शिवीगाळ केली व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली नसल्याचे कथन केले. साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले.

**१०.** अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांना त्यांच्या जबाबातील चिन्हांकित भाग अ वरील मजकूर वाचून दाखविण्यात आला असता, तो बरोबर नसल्याचे त्यांनी कथन केले. जबाब पोलिसांनी तसा का नमुद केला याबाबत ते सांगू शकत नाही असे कथन केले. पुढे तिने तडजोड झाल्याने त्यांचीतील वाद मिटले असल्याचे कथन केले आहे. पुढे तिने आरोपी त्यांचे ओळखीचे व गावातील असल्याने आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

**११.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादीने व

साक्षीदाराने अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. साक्षीदारांनी आरोपी क्र. ०१ ते ०४ यांनी घटनेच्या दिवशी फिर्यादीस अवघड जागेवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच, जनाबाई हिचे कंबरेचे माकड हाड मोडले असल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली होती हे स्पष्टपणे नाकारले आहे. घटनास्थळ पंचनाम्याच्या अवलोकनावरुन घटनास्थळी तथाकथित घटना घडली परंतू, आरोपींनी फिर्यादीस मारहाण केली ही बाब सदर पंचनाम्यावरुन सिध्द होत नाही. केवळ, सदर ठिकाणी पंचनामा करण्यात आल्याची बाब सिध्द होते.

**१२.** एकंदरीत उपलब्ध पुराव्याचे अवलोकनावरुन खटल्यातील साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य होईल असे कथन केलेले नाही. फिर्यादी यांनी दि. ०१/०९/२०१६ रोजीच्या घटनेबाबत अभियोगपक्षास सहकार्य होईल अशी साक्ष दिली नाही. याउलट, दि. ०१/०९/२०१६ रोजी कोणतीही घटना घडली नसल्याचे फिर्यादीने कथन केले आहे.

**१३.** एकंदरीत फिर्यादीने व जखमी साक्षीदाराने अभियोग पक्षाचे कथनाशी विसंगत साक्ष दिल्याने आरोपींविरोधात गुन्हा सिध्द होईल असा पुरावा अभियोग पक्ष सादर करण्यास सपशेल अपयशी ठरलेला आहे.

**१४.** अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा व जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपींनी मान्य केले आहेत. जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र

पाहिले असता जखमीला जखमा झाल्या होत्या हे स्पष्ट होते. परंतू, सदरच्या जखमा ह्या आरोपींनी मारहाण केल्यामुळेच झाल्या असे सिध्द होत नाही. घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकनावरुन घटनास्थळी जी घटना घडली होती ती बाब सिध्द होते. परंतू, सर्व आरोपी घटनास्थळी हजर होते असे सप्ष्ट होत नाही. सबब, आरोपींना भा.दं.वि. चे कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा सिध्द झालेला नाही. सबब, मुद्दे क्र. ०१ ते ०४ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र. ०५ करीता :-</u>**

**१५.** वरील विवेचन गृहीत धरता, आरोपी क्र. ०१ ते ०४ गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. दत्तात्रय दातीर (सा. क्र. १) व जनाबाई दातीर (सा. क्र. २) यांचे न्यायालयातील साक्षीतील कथन त्यांचे पोलिसांकडे नोंदविलेल्या जबाबाशी विसंगत आहे. त्यांनी त्यांचे साक्षीत आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने वाद मिटला असल्याचे कथन केले आहे. सबब, न्यायालयातील साक्षीत सदर साक्षीदाराने तशी भुमिका घेतल्याचे दिसून येत असल्याने खोटी साक्ष दिल्याच्या गुन्ह्यासाठी त्यांचेविरुध्द कारवाई करणे, उचित वाटत नाही. दोषारोप पत्रात नमुद जप्त मुद्देमाल न्यायालयासमक्ष सादर करण्यात आलेला नाही. आजरोजी तो न्यायालयासमक्ष सादर होणे योग्य व न्यायोचित होणार नाही. सबब, गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल म्हणजेच १. एक लांब बाहीचा शर्ट फिकट रंगाचा तपकिरी रेशा असलेला जुना वापरता व २. एक राखाडी रंगाची हॉफ पॅन्ट

नायलान कमर पट्टा असलेला तिस दोन जांभळे पट्टी असलेली, जुनी मळकटलेली, फाटलेली वापरती हे नियमाप्रमाणे अपिलकालावधीनंतर विल्हेवाट लावण्याबाबत पोलिस निरीक्षक सिन्नर पोलिस ठाणे यांना निर्देशित करण्यात येते. सबब, मुद्दा क्र. ०५ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :-

# आदेश

१. आरोपी क्र. **१. दत्तु गोपाळा सदगिर, २. नाथा उर्फ एकनाथ गोपाळा सदगिर, ३. कुसुमबाई दत्तु सदगिर** व **४. कमळाबाई गोपाळा सदगिर** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणा-या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहितेच कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक व जामीनदारांचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल- १. एक लांब बाहीचा शर्ट फिकट रंगाचा तपकिरी रेशा असलेला जुना वापरता व २. एएक राखाडी रंगाची हॉफ पॅन्ट नायलान कमर पट्टा असलेला तिस दोन जांभळे पट्टी असलेली, जुनी मळकटलेली, फाटलेली वापरती हे अपिलकालावधीनंतर नियमाप्रमाणे पोलिस निरीक्षक सिन्नर पोलिस ठाणे यांनी विल्हेवाट करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR

Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2026.05.12 17:12:53 +0530

**( लक्ष्मीकांत चं. वाडीकर )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
सिन्नर न्यायालय, सिन्नर.

ठिकाणी - सिन्नर.
दिनांक - १२/०५/२०२६.